**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(दुपार)**

**दिनांक २५.०८.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २४.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ११ केसेसमध्ये १२ ईसमावर कारवाई करून एकुण १७,१९,८७०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,२८७ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,८०,६५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक २४.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २५.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये **०४** ईसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) परिमंडळ क्र. ५ अंतर्गत कुख्यात ०२ गुंड हद्दपार :—**

परिमंडळ क्र. ५ अंतर्गत पोलीस ठाणे कळमणा हद्यीत राहणारे गुन्हेगार इसम नामे **१) आसिफ अली वल्द इम्तियाज अली वय २१ वर्ष रा. मोहनलाल वाजपेयी नगर, शनि मंदीरजवळ, कळमणा नागपूर २) संतोष उर्फ मामा उर्फ कुबडया राजुदास यादव वय ३२ वर्ष रा. प्लॉट क्र. ५, वांजरी ले आऊट, गुलशन नगर कळमणा, नागपूर** यांचेविरूध्द पोलीस ठाणे कळमणा येथे लोकांना दमदाटी व मारपीट करणे, खुनाचा प्रयत्न, घातक शस्त्र बाळगणे, अवैध दारुविक्री करणे, सट्टयाची खायवाडी करणे, अंमली पदार्थ बाळगणे, विक्री करणे, शिवीगाळ, धमकी देणे अशा गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असुन, त्यांचेवर वारंवार प्रतिबंधक कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता कळमणा पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. श्री नित्यानंद झा, पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०५, नागपुर शहर यांचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०५, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. १) ०५/२०२६ दिनांक २१.०८.२०२६ व २) ०६/२०२६ दिनांक २१.०८.२०२६ अन्वये दोन्ही गुन्हेगारांना नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतून ०१ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला आहे.

**३) परिमंडळ क्र. ०५ चे हद्दीतुन एकुण १०४ गुन्हेगार तात्पुरते हद्दपार :—**

नागपूर शहरातील इद—ए—मिलाद या सण/उत्सवाचे अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राहणेकामी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्र. ०५, नागपूर शहर अंतर्गत पोलीस ठाणे हद्दीतील शरीराविरूध्द, मालमत्तेविरूध्द गुन्हे करणारे तसेच अवैध दारू विक्री करणारे एकुण १०४ इसमांना त्यांचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग होण्याची दाट शक्यता असल्याने पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्र. ०५, नागपूर शहर यांचेकडून त्यांना प्राप्त विशेष कार्यकारी दंडाधिकारी पदाच्या अधिकारांन्वये कलम १६३(२) भा.ना.सु.सं. अन्वये **दिनांक २४.**

**०८.२०२६ ते २८.०८.२०२६ पर्यंत ०५ दिवसांचे कालावधीकरीता** त्यांना नागपूर शहराचे हद्दीत राहण्यास परावृत्त करण्यात आले आहे. आरोपींमध्ये पोलीस ठाणे यशोधरानगर–४०, कळमणा–१५, पारडी–२१, वाठोडा–१०, वाठोडा–१०, भांडेवाडी–१८ असे एकूण १०४ गुन्हेगारांचा समावेश असून त्यांना नमुद कालावधीचे दरम्यान पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात प्रवेश न करण्याबाबत आदेशीत करण्यात आलेले आहे. गुन्हेगारांनी हद्दपार आदेशाचा भंग करुन सार्वजनिक शांततेला बाधा आणणारी कोणतीही कृति केल्यास किंवा नागपूर शहरात प्रवेश केल्यास त्यांचेविरुध्द कठोर कारवाई करण्यात येईल.

**४) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :– अवैध हुक्का पार्लर चालकांविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २५.०८.२०२६ चे ०१.३० वा. ते ०४.४५ वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत लक्ष्मीकृपा अपार्टमेंट, एनबी रोड, व्हीनस बुक डेपो समोर, गोकुलपेठ येथील निंबस लाऊंज येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी हुक्का पार्लर मालक शेख समीर शेख वकील अहमद वय ३२ वर्ष रा. प्लॉट नं. ३३५, कुतुबशाह नगर, काटोल रोड, गिट्टीखदान, नागपूर हा त्याचे तीन वेटर द्वारे १० ग्राहकांना शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता पुरवितांना समक्ष मिळुन आला. आरोपी हा विनापरवाना स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखु व ईतर साहित्य असा एकुण १३,८७०/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी मालक, वेटर व ग्राहक यांचेविरूध्द पोलीस ठाणे अंबाझरी येथे कलम ४,६,७,८,२०,२१ सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम २००३ महाराष्ट्र सुधारणा अधिनियम २०१८ सहकलम ३३ सहकलम १३५ मपोका सहकलम २७२ भान्यासं अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपींना मुद्देमालासह अंबाझरी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. डॉ. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षिरसागर, सपोनि आनंद बिचेवार व पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**५) गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पोलीसांची कामगिरी :– हद्दपार ईसमास घातक शस्त्रासह अटक.**

दिनांक २५.०८.२०२६ चे ००.३० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ३ चे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे तहसील हद्दीत पेट्रोलींग करीत असता, कोलबास्वामी वाचनालयाजवळ सुलभ शौचालयाचे मागे एक इसम पोलीसांना पाहून लपल्याने, त्यास पळून जाण्याचे प्रयत्नात ताब्यात घेतले. त्यास नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सुरेंद्र उर्फ कल्लु लिलाधर होले वय २६ वर्षे, रा. गोळीबार चौक, तहसील, नागपूर असे सांगीतले. त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे माग कंबरेत एक लोखंडी चाकु किंमती ३००/–रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला. आरोपीला पोलीस ठाणे तहसील येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०३ यांचे हद्दपार आदेशान्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत घातक शस्त्र बाळगुन दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे तहसील येथे आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो.का., सहकलम ४, २५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. डॉ. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांच्या

मार्गदर्शनाखाली, पोनि. अतुल मोहनकर, पोउपनि मधुकर काठोके, पोहवा अजय पाटील, पोअं दीपक लाकडे, चंद्रशेखर डेकाटे, प्रमोद देशभ्रतार व अनिल बोटरे यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे जरीपटका :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

थ्दनांक २४.०८.२०२६ चे ११.०० वा. ते १९.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत प्लॉट क्र. १६, गली क्र. ११, मिसाळ ले आऊट, जरीपटका, नागपूर येथे राहणारे फिर्यादी कयुम शाह अयुम शाह वय ६१ वर्ष हे आपले राहते घराला कुलुप लावुन कामावर येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ३,९२,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यात्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे सपोनि कपील म्हस्के ९६८९८७७८८८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) <u>पोलीस ठाणे हुडकेश्वर</u> :—** सौ. रिया सितेश कपोडिया वय २४ वर्षे, रा. प्लॉट नं. १५, निलकमल नगर, नरसाळा, लोखंडेचे घरी किरायाने, नागपूर ह्या दिनांक १४.०८.२०२६ चे १९.०० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता सोबत लहान मुलगी सनाया वय ९ महिने हिचेसह कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची—४ फुट, केस—काळे लांब, अंगात—लाल रंगाची साडी घातलेली आहे. भाषा—हिंदी/मराठी बोलतात.

**२) <u>पोलीस ठाणे अंबाझरी</u> :—** सौ. गंगा पवन उईके वय ३६ वर्षे, रा. पांढराबोडी चौकीजवळ, बागडेचे घरी किरायाने, अंबाझरी, नागपूर ह्या दिनांक १८.०८.२०२६ चे ०७.०० वा. पासुन पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीतील शिवाजी पार्क येथून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—लांब, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट ४ इंच, केस—काळे बॉयकट, अंगात—सलवार सुट व गुलाबी स्कार्फ घातलेला आहे. भाषा—हिंदी/मराठी बोलतात. ओळखचिन्ह— उजवे दंडावर त्रिशुल चिन्ह व हातावर गंगा नाव गोंदलेले आहे.

**३) <u>पोलीस ठाणे सक्करदरा</u> :—** दिप्ती गिरजाप्रसाद मधुमटके वय ३२ वर्षे, रा. क्वॉर्टर क्र. ३/७, रघुजी नगर, सक्करदरा नागपूर ही दिनांक २०.०८.२०२६ चे १३.४५ वा. मोबाईल दुरुस्ती करीता जाते असे सांगून पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीतील राहते घरुन कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा— सडपातळ, उंची—५ फुट ६ इंच, केस— काळे लांब,

अंगात– निळया रंगाचा कुर्ती टॉप व काळ्या रंगाचा पॅन्ट घातलेला आहे. भाषा– मराठी/हिंदी बोलते. ओळख– पाठीवर ईगल पक्षी गोंदलेला असुन इंग्रजीमध्ये डी अक्षर गोंदलेले आहे.

**४) पोलीस ठाणे सक्करदरा :–** कु. लक्ष्मी संजय शाहु वय १४ वर्षे, रा. अवलिया नगर, शामबाग, मोठा ताजबाग, सक्करदरा नागपूर ही दिनांक ०४.०८.२०२६ चे १६.०० वा. राहते घरुन कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–सडपातळ, उंची–५ फुट, केस– काळे, अंगात– जांभळी कुर्ती व पांढरा पायजामा व काळा दुपटटा घातलेला आहे. भाषा– मराठी/हिंदी बोलते. ओळख– उजवे गालावर जुने निशान आहे.

**५) पोलीस ठाणे हुडकेश्वर :–** कु. रोशनी दिलीप शेंद्रे वय २० वर्षे, रा. प्लॉट क्र. ५३, इंद्र नगर, नरसाळा, हुडकेश्वर नागपूर ही दिनांक २१.०८.२०२६ चे ११.०० वा. राहते घरुन कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–मजबुत, उंची–५ फुट २ इंच, केस–काळे, अंगात–कुर्ती व जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा– मराठी/हिंदी बोलते.


सौ. रिया


सौ. गंगा


दिप्ती


कु. लक्ष्मी


कु. रोशनी

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १७ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०१५३८/ २००८ | कलम ४२०, ४६७, ४६८, ३४ भा.दं.वि. | कविता दुर्गाप्रसाद तिवारी वय १८ वर्षे, रा. सी एस पांडे यांचे घरी, मुंजे ले आऊट, नागपुर | २७.०८.२०२६ |
| २. | मा. १७ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३२४११३६ /२००३ | कलम ३४२,३६३, ३७७ भा.दं.वि. | वेदराम हरवणसिंग हरसना वय ४६ वर्षे, रा. महाराष्ट्र आर्मड् स्क्वॉड्रन, व्हिसीए बिल्डींग, सिव्हील लाईन, नागपुर | २७.०८.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**